# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक ३९ वा ❑ बुधवार दि.१२ मार्च २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## सुशिक्षित लोकही सायबर फसवणुकीचे बळी

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय साहित्य**

संप्रेषण तंत्रज्ञानामुळे लोकांचे जीवन सोपे झाले आहे, परंतु त्याच्या गैरवापरामुळे लोकांची डिजिटल सुरक्षा धोक्यात आली आहे. सायबर फसवणूक करणारे दररोज कोणाच्या तरी खात्यातून पैसे चोरतात किंवा डिजिटल गोपनीयतेचा भंग करून लोकांना फसवणुकीचे बळी बनवतात. अनेक शिक्षित लोक, नोकरी पेशा करणारे, व्यावसायिक ठगले जात आहेत.

ऑनलाइन काम करून दररोज १००० ते ५००० रुपये कमवण्याच्या लोभात सुशिक्षित लोकही लाखो रुपये गमावत आहेत. या प्रकारची फसवणूक सहसा इंस्टाग्राम आणि टेलिग्रामद्वारे सुरू होते. बहुतेक प्रकरणांमध्ये, परदेशी क्रमांक वापरले गेले आहेत. सर्वप्रथम, हे सायबर गुन्हेगार काही दिवसांत शेकडो संदेशांची देवाणघेवाण करून लोकांचा विश्वास संपादन करतात. त्यानंतर त्यांना बनावट ऑनलाइन ट्रेडिंग प्लॅटफॉर्ममध्ये मोठ्या प्रमाणात पैसे गुंतवण्यास प्रवृत्त केले जाते. मग हे बनावट ॲप्स त्यांना गुंतवणूक आणि नफ्याबद्दल चुकीची माहिती देतात.

अशिक्षित नागरिकांची फसवणूक होत असेल तर आपण समजू शकतो.मात्र उच्च शिक्षित नागरिक व व्यावसायिक मोठ्या प्रमाणावर ठगले जात आहे.शिक्षित लोग तर हे

हे संदेश कुठून येतात आणि त्यांचे स्रोत काय आहेत हे तर समजू शकता. मात्र पैसे मिळेल या लालसेपोटी इथे फसगत होते..

यवतमाळ जिल्ह्यातील वणी येथील एका शिक्षकाला १४ लाखांनी सायबर भामट्यांनी गंडा घातला. हे महाशय पेशाने शिक्षक. मात्र पैशाला मोहाला बळी पडले आणि लाखो रुपये गमावून बसले.

कमी किमतीत शेअर मिळवून देण्याचे आमिष दाखवून अज्ञात सायबर भामट्याने १३ लाख ६७ हजाराचा गंडा घातल्याची घटना वणी येथे उघडकीस आली. आरोपी महिलेने किशोर चौधरी या शिक्षकाला व्हाट्सअप वरून चॅटिंग करून ५०% डिस्काउंट रेटवर आयपीओ सबस्क्राईब करून देण्याचे आश्वासन दिले होते यासाठी प्रायमरी ट्रेडिंग अकाउंट काढण्यासाठी एका कंपनीचे मोबाईल ॲप डाऊनलोड करण्यासाठी त्यावरून चौधरी यांनी जमा केली रक्कम दर्शविल्यात जात होती. तसेच या रकमेचा वापर करून त्यांनी करावयास सांगितलेल्या ट्रेड द्वारे चौधरी यांच्या प्रायमरी शेअर मार्केट अकाऊंटमध्ये ४४ लाख ६५ हजार ५७४ रुपयांची रक्कम जमा असल्याचे दिसत होते त्यानंतर संबंधित ग्रुपच्या महिला एडमिनने चौधरी यांना पुन्हा नवीन येऊ घातलेल्या एका कंपनीच्या आयपीओला सबस्क्राईब करण्यासाठी मात्र चौधरी यांनी आता आपल्याकडे पैसे नसल्याचे सांगितले. आपली फजगत होत आहे असे लक्षात येतात.त्यांनी वणी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली.

सायबर फसवणूक करणारे त्यांच्या बळींना अडकवण्यासाठी त्यांच्या संभाषणात अनेक तांत्रिक संज्ञा वापरतात. जर लोकांना थोडेसे सामान्य ज्ञान आणि मूलभूत ज्ञान असेल तर ते सायबर फसवणूक टाळू शकतात. एथिकल हॅकिंगच्या भाषेत, याला सोशल इंजिनिअरिंग म्हणतात, ज्याद्वारे लोकांचा विश्वास जिंकता येतो.

सायबर फसवणुकीच्या जाळ्यात अडकण्याचे एकमेव कारण म्हणजे घाईघाईने घेतलेले निर्णय. असे कोणतेही तंत्र नाही जे तुम्हाला एका रात्रीत श्रीमंत बनवू शकेल. लोक आता पुस्तकांवर कमी वेळ आणि इंटरनेटवर जास्त वेळ घालवू लागले आहेत.

**सायबर फसवणूक टाळण्याचे मार्ग :**

एसएमएस, ईमेल किंवा सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरून आलेल्या संशयास्पद लिंक्सवर कधीही क्लिक करू नये. मोठ्या रकमेचे आश्वासन देणारे अनपेक्षित ईमेल, कॉल आणि संदेश बनावट आहेत. त्यामुळे कष्टाचे पैसे धोक्यात घालू नये.

तुमचे कार्ड ब्लॉक झाल्याचे सांगणारे किंवा तुम्हाला मोठ्या प्रमाणात पैसे देण्याचे आश्वासन देणारे आरबीआयच्या नावाने येणारे एसएमएस, फोन कॉल, ईमेल यांना फसवू नका.एसएमएस किंवा ईमेलद्वारे मिळालेल्या लिंकवर क्लिक करून तुमच्या बँक खात्याची माहिती देऊ नये. बँकेच्या अधिकृत साइटवर किंवा तुमच्या क्रेडिट किंवा डेबिट कार्डच्या मागील बाजूस दिलेल्या माहितीवरच विश्वास ठेवावे.

# पाचव्या जनसंवाद ग्रामीण साहित्य संमेलनात एकूण १७ ठराव मंजूर!

**ज्योतिर्मय साहित्य**

**नांदेड** – भटक्या जाती – जमाती,विमुक्त समुहातील पालात राहणाऱ्या मुलामुलींच्या शिक्षणासाठी राज्य शासनाने उपाययोजना कराव्यात. तसेच लोहा जिल्हा नांदेड येथे पालात राहणाऱ्या भटक्या विमुक्तांच्या पाल्यांच्या शिक्षणासाठी विविध उपक्रम राबविणारे मा. राजीव तिडके यांच्या शिफारशीनुसार कार्यवाही करावी, असा ठराव भोकर तालुक्यातील मातुळ येथे नुकत्याच संपन्न झालेल्या पाचव्या जनसंवाद ग्रामीण साहित्य संमेलनात घेण्यात आला. यांसह इतर एकूण १६ ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आले. यावेळी संमेलनाध्यक्ष प्रो. डॉ. गजानन देवकर, स्वागताध्यक्ष सतिश पाटील मातुळकर, निमंत्रक बालाजी सूर्यतळे मुख्य संयोजक दत्ताहरी कदम, सप्तरंगी साहित्य मंडळाचे संस्थापक अध्यक्ष अनुरत्न वाघमारे, राज्याध्यक्ष नागोराव डोंगरे, उपाध्यक्ष पांडुरंग कोकुलवार, कार्याध्यक्ष प्रज्ञाधर ढवळे, कोषाध्यक्ष शंकर गच्चे, महिला विभाग प्रमुख रुपाली वागरे वैद्य, जिल्हाध्यक्ष रणजित गोणारकर, सचिव चंद्रकांत कदम, जीवन मांजरमकर आदींची उपस्थिती होती. सर्व ठरावांचे वाचन सप्तरंगी बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे सचिव पांडुरंग कोकुलवार यांनी केले. त्यास उपस्थित पदाधिकारी यांनी आवाजी समर्थन देऊन मंजूर केले.

येथील सप्तरंगी बहुउद्देशीय सेवाभावी संस्था संचलित सप्तरंगी साहित्य मंडळाच्या पाचव्या जनसंवाद ग्रामीण साहित्य संमेलनाचे आयोजन भोकर तालुक्यातील मातुळ येथे करण्यात आले होते. या संमेलनाच्या समारोप सत्रात एकूण १७ ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आले. पुढील ठराव असे : भटक्या विमुक्त आदिवासी कलावंतांना दरमहा पंधरा हजार रुपये मानधन मिळावे. भटक्या विमुक्तांसाठी स्वतंत्र मंत्रालय उभा करण्यात यावे. भटक्या जातीमधील ४२ जातींना रोजगार उपलब्ध करून द्यावा, वादग्रस्त सीमा भागावर केंद्र सरकारने तत्काळ तोडगा काढण्याचा मागणी करणारा ठराव मांडण्यात आला. केंद्र शासनाने वादग्रस्त सीमा भागाला तात्काळ महाराष्ट्र राज्यामध्ये सामील करण्याचा तोडगा काढावा, शासनाने गावागावातील ग्रंथालयांना उर्जितावस्था यावी यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करावे. जानेवारी ऐवजी शासनाच्या वतीने मराठी भाषा पंधरवडा २७ फेब्रुवारी ते १४ मार्च या कालावधीत साजरा केला जावा, संत गाडगेबाबा यांची जयंती म्हणजे २३ फेब्रुवारी हा दिवस मराठी बोलीभाषा दिन म्हणून साजरा करावा. महाराष्ट्रातील बोलीभाषांच्या संवर्धनासाठी शासनाने बोलीभाषा विकास अकादमी स्थापन करावी. महाराष्ट्रातील विविध विद्यापीठांमध्ये त्या भागातील बोली भाषांचा समावेश अभ्यासक्रमामध्ये करण्यात यावा, महाराष्ट्रातील वाढती गुन्हेगारी, विद्यार्थ्यांचे मृत्यू, स्त्रियांवरील अत्याचार ही परिस्थिती चिंताजनक आहे. हे चित्र बदलण्यासाठी तातडीने परिणामकारक कृतीची, कायद्याच्या कठोर अंमलबजावणीची आणि गुन्हेगारी मोडून काढण्यासाठी आकृतीबंध तयार करावा, अखिल भारतीय साहित्य संमेलनाला दिले जाणारे शासकीय अनुदान तत्काळ बंद करावे. आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंब आणि तासिकावर काम करणाऱ्या शिक्षकांना ते अनुदान वर्ग करण्यात यावे.

तसेच सावित्रीबाई फुले विद्यापीठातील बोध चिन्हातील विषमतेचा प्रतीक असलेला शनिवार वाडा काढून त्याऐवजी स्वराज्याचा प्रतीक असलेला लाल महाल समाविष्ट करावा.तसेच सावित्रीबाई फुले यांच्या सहकारी शिक्षिका फातिमा शेख यांचे स्मारक उभारण्यात यावे, देशातील जातनिहाय जनगणना करावी आणि ईव्हीएमचा वापर बंद करून बॅलेट पेपरवर मतदान प्रक्रिया राबविण्यात यावी, ग्रामीण भागातील मुलामुलींच्या लग्नाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे, यासाठी सरकारने प्रयत्न करावे. गरीब कुटुंबांतील मुलामुलींचे शिक्षण आणि नोकऱ्या या संदर्भाने विविध उपक्रम हाती घ्यावेत, प्रत्येक महाविद्यालयात पाली भाषा विषय सुरू करण्यात यावा. कोणत्याही परिस्थितीत राज्यातील मराठी शाळा बंद करण्यात येऊ नयेत. नवीन इंग्रजी शाळांना मान्यता देण्यात येऊ नये, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी तत्काळ बंद करण्यात यावी, शिक्षणाचे खाजगीकरण थांबवावं. मोफत , दर्जेदार शिक्षण द्यावे आणि नवीन शिक्षक भरती करावी, समन्वयी पाणीवाटप धोरणाची तात्काळ अंमलबजावणी व्हावी, मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्र हा भेद टाळावा, मराठवाड्याचे हक्काचे पाणी द्यावे. अनावश्यक प्रकल्पासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी काढून घेण्याचे षडयंत्र थांबवण्यात यावे, आदिवासींना वनवासी म्हणून त्यांचे मूलनिवासीपण नाकारणाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यात यावे. आदिवासींचा धर्माचा उल्लेख संविधानानुसार बंद करण्यात यावा, मराठवाड्यातील आणि महाराष्ट्रातील शासकीय जमिनीवर गुरे चारणारे, दलित, आदिवासी, भटक्या विमुक्त कष्टकरी, भूमीहीन उपजीविका भागवण्यासाठी जमीन कसत आहे. जमिनी त्यांच्या नावावर करून सातबारा द्यावा. जंगल निवासी यांचे अधिकार मान्य करावे, वन कायदा २००६ ची अंमलबजावणी करून दावेदारांना सातबाराचा उतारा देण्यात यावा, अनुसूचित जाती आणि जमाती त्याचबरोबर इतर मागासवर्गीय यांना परदेशी शिक्षण घेण्यासाठी बंद करण्यात आली आहे. ती शिष्यवृत्ती पुन्हा चालू करावी, सामाजिक आणि न्याय आदिवासी विभागाचा निधी शासनाने इतरत्र न वळवता नियोजित उपक्रमासाठीच खर्च करण्यात यावा. ग्रामीण भागातील मिळणारा निधी आणि सेवासुविधा यांतील कामांमध्ये होणाऱ्या भ्रष्टाचाराविरुद्ध कडक उपाययोजना कराव्यात.

# श्रीयश प्रतिष्ठाणमध्ये आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त महिला सक्षमीकरण सेलचे उद्घाटन

**ज्योतिर्मय साहित्य**

**छत्रपती संभाजीनगर** – येथील श्रीयश प्रतिष्ठाणच्या श्रीयश कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नोलॉजीमध्ये आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधून महिला सक्षमीकरण सेलचे उद्घाटन करण्यात आले. या सेलचा मुख्य उद्देश लिंग समानता प्रस्थापित करून महिलांना सर्व क्षेत्रात सक्षम बनवणे आणि एक समावेशक व सहाय्यक वातावरण निर्माण करणे हा आहे. उद्घाटन समारंभादरम्यान श्रीयश प्रतिष्ठाणचे अध्यक्ष बसवराज मंगरूळे यांनी त्यांचा वैयक्तिक संघर्ष व उद्योजकीय प्रवासातील प्रेरणादायक कथा उपस्थितांसमोर मांडल्या तसेच स्त्रीशक्तीचे महत्त्व स्पष्ट केले. कार्यक्रमाचे सल्लागार आणि अतिथी प्रभाकर उदावंत यांनी महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणावर मार्गदर्शन करत मौल्यवान माहिती व धोरणे उपस्थितांसमोर मांडली. या कार्यक्रमाला श्रीयश कॉलेज ऑफ



इंजिनिअरिंग, आयटी सेलमधील सर्व महिला कर्मचारी आणि पॉलिटेक्निकमधील सर्व महिला प्राध्यापक उपस्थित होत्या. तसेच, श्रीयश कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नोलॉजीच्या संगणक विज्ञान विभागातील प्राध्यापकांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले.

## लक्षवेधी छायाचित्र....



**गाळलेल्या घामाच्या प्रत्येक थेंबाचे**
**होईल सोने तू विश्वास ठेव गड्या,**
**भविष्य तुझे गोडच असणार.....**

(शब्द छाया : संजय व्यापारी )

# हे सूरांनो ‘‘चंद्र व्हा’’

**ज्योतिर्मय साहित्य**



ऋतुराज पतकी, कोल्हापूर

आज एकादशी. सकाळी सकाळी सुरेल खणखणीत आवाजात कुणी लहानगा आपल्या सूरांना ‘‘चंद्र व्हा‘‘ म्हणत होता. गाण्याचा आवाज ऐकून बाहेर जाऊन पाहिलं तर रंकाळ्यावर समोर कुणीच गाताना दिसत नव्हतं. मग तिथे पोहायला जाणाऱ्या एकाला हाक मारून विचारलं,

‘‘ओ दादाऽऽऽ, कोण गातंय?‘‘,

आणि उत्तर मिळालं, ‘‘हा काय इथे गातोय.‘‘

‘‘त्याला जरा बोलावता का?‘‘.

त्याबरोबर गंध लावलेला, गळ्यात पट्टा बांधलेली लहानशी हार्मोनियम घेतलेला एक लहानगा मुलगा झाडातून पुढे आला. त्याला म्हंटलं, ‘‘ये बाळ, घरी ये.‘‘

थोडासा संकोचलेला तो घरी आला. नावं रामेश्वर. गदग इथला राहणारा. मूळ कन्नड भाषिक, पण ‘‘इंग्लिश, हिंदी आणि थोडी मराठी पण कळते मला‘‘ असं हसतमुखाने सांगणारा इयत्ता पाचवी – सहावीतला हा मुलगा. आपल्या वडिलांकडेच गाण्याचे प्राथमिक शिक्षण घेत आहे म्हणाला.

‘‘घसा... खराब. ठीक नाई‘‘ असं आपल्या जमेल तितक्या मराठीत आणि उरलेले सारे हातवारे करून आम्हाला सांगितलं खरं, पण आमच्या या बुवांनी पहिला सूर लावला आणि मग तीन गाणी एका पाठोपाठ उत्तम गायली. पैकी एक कन्नड.

त्याच्या गायनाबरोबरच त्याच्या हार्मोनिअम वाजवण्याचं फार कौतुक वाटलं मला. तो व्यवस्थित कॉर्ड धरत होता, हात सफाईने फिरत होता. हार्मोनिअमचा भाता थोडा जड होता, पण स्वरांची वजनं त्याच्या मनात व्यवस्थित वाजत आहेत हे नक्कीच जाणवत होतं!

कदाचित भाषेचा अडसर असल्यामुळे असेल, आमचा त्याच्याशी संवाद म्हणजे आमच्या ओंजळभर शब्दांना त्याच्याकडून केवळ सुहास्यवदनी एका शब्दात उत्तर!

‘‘चहा देऊ?‘‘ -- ‘‘नको.‘‘

‘‘बरं, मग गरम दूध?‘‘ -- ‘‘नको.‘‘

‘‘सकाळी लवकर बाहेर पडला असशील ना?‘‘ -- ‘‘सहा.‘‘

‘‘अरे मग, थांब. काहीतरी गोड खाऊन जा.‘‘ -- ‘‘नको.‘‘

असा आमचा हा संवाद अखेर ‘‘हे तुझ्या बॅगेत भरून घेऊन जा; आणि वर हे थोडे ... खाऊसाठी!‘‘ यावर संपला, आणि इथे मी त्याच्या उत्तराची वाट पाहिली नाही! विठ्ठला, तू कुठल्या रुपात येऊन जाशील ते माझ्यासारख्याला कळणे अशक्य. मीच माझ्या अंतरी मग निर्मिला हा श्रीहरी मीच माझी पंढरी अन् विठ्ठला, तू वारकरी! माझ्या एका कवितेतल्या या ओळींप्रमाणे एकादशीच्या दिवशी अनपेक्षित भेटलेल्या या लहानग्या रामेश्वरने ईश्वराच्या नामस्मरणाने सकाळ सुरेल केली. या सूर-साधकाचे भावी जिवन सुरेल होवो हीच ईश्वराच्या चरणी मनोमन प्रार्थना.





– विद्यावाचस्पती विद्यानंद
Mobile: +917709612655
Email: vidyavachaspati.vidyanand@gmail.com

आनंदी पहाट...

## श्रेष्ठत्व आर्थिक बळावर ठरवू नये

ज्योतिर्मय साहित्य

एकाच घरातील, एकाच कुटुंबातील प्रत्येक सदस्यांत देखील अशी जीवघेणी स्पर्धा सुरु असल्याचे अनेक ठिकाणी पाहायला मिळते. दोन भावंडांमध्ये एका भावाने चारचाकी गाडी घेतली कि दुसऱ्याच्या दारांत अधिक महागडी गाडी उभी राहतेच. एकमेकांमध्ये, मोठा मीच, हे सिद्ध करण्याची जीवघेणी स्पर्धा सुरु रहात असते. अनेकदा आपल्या आवाक्याबाहेर जाणाऱ्या किमतीची गाडी घेऊन आर्थिक विवंचनेत सापडल्याची उदाहरणे पाहायला मिळतात. गाडीच्या सुखापासून वंचित राहायला लागून, गाडी विकत घेण्यासाठी मिळवलेल्या लोन, त्यांचे फोन ह्याच चक्रव्यूहात सापडलेल्याचे डोके चक्रावून जाते. आपण जे नाही आहोत, ते आहोत हे दाखवण्यात अहंकार आणि दंभ वाढतो, आर्थिक लकवा आणि मानसिक थकवा नैराश्याच्या दिशेने मार्गक्रमण करायला लागतो. कौटुंबिक विजय मिळवण्याच्या जीवघेण्या स्पर्धेत आभासी दुनियेतील मोठेपण प्राप्त झाल्यासारखे जरी वाटत असले, तरीही प्रत्यक्षांत परस्परांतील नातेसंबंधातून सर्वांना सुख, समाधान आणि मन:शांती प्राप्त होणे जरुरीचे असते.


सद्य:स्थितीत समाजातील श्रेष्ठत्व आर्थिक बळावर ठरत असल्याचे सर्वत्र दिसून येते. आर्थिक पातळीवर जो ज्येष्ठ तोच समाजात श्रेष्ठ असल्यामुळे त्या जेष्ठत्व, श्रेष्ठत्व प्राप्तीसाठी खूपच मोठी स्पर्धा लागलेली असते. ही स्पर्धा आणि स्पर्धेचे स्वरूप कसेही असले, तरीही त्यांत उतरणाऱ्या स्पर्धकास त्याची जाणीवच नसते. त्याच्या दृष्टीकोनातून तो स्वतः धनाढ्य होणे, हेच महत्वाचे असते. आर्थिक विजयासाठी पत्करलेला मार्ग कसा आहे? आपला त्या संबधीचा विचार, वर्तन आणि व्यवहार योग्य आहे का? आर्थिक विजयासाठी पाण्यासारखा पैसा खर्च करणे भूषणावह वाटत असते. अनधिकृत आणि अवैधरीत्या आर्थिक विजय मिळवणे कौतुकास्पद ठरू शकते का? एकूणच प्रत्येक जीवघेण्या स्पर्धेचे आणि त्याच्या परिणामांचे गांभीर्य नसणे हीच खरे तर उणिव म्हणावी लागेल.

## कसं हुईल, काय हुईल...!

ज्योतिर्मय साहित्य





जॉनचं जानराव असं केलेलं नामकरण अफलातून आहे. जॉन जेव्हा इंग्रजीत बोलतो, तेव्हा तिकडच्या धाटणीचे इंग्रजी उच्चार लक्ष्मण देशपांडे यांनी ज्या पद्धतीने केले आहेत, ते जबरदस्तच म्हणावे लागेल. ज्युडीचं जुडी मेथीची की शोपुची यासारखी वाक्ये मनमुराद हसवतात. पारावर बसलेल्या आणि तंबाखू मळणाऱ्या लोकांच्या बोलण्याचेही अफलातून सादरीकरण त्यांनी केले आहे. अशा बोलण्यासारख्या आणि सांगण्यासारख्या खूप गोष्टी आहेत.



एकूणच मानवी स्वभावाचं बारीक निरीक्षण दाद घेऊन जातं. व्यक्तींचे स्वभाव वैशिष्ट्य स्पष्ट करतं. मला या ठिकाणी मधुकर तोरडमल यांच्या तरुण तुर्क म्हातारे अर्क या नाटकाची आठवण येते. या नाटकात सुद्धा तोरडमल यांनी व्यक्तींचे सूक्ष्म निरीक्षण करून त्यांच्या लकबी फार उत्तम सादर केल्या आहेत. त्यांची या नाटकातील ह ची बाराखडी तर धमाल करते आणि प्रेक्षकांना पोट धरून हसायला लावते. पुलं सुद्धा याबाबतीत ग्रेटच ! त्यांच्या एकेक कथा सादर करताना त्यांनी त्या त्या पात्रांचे जे गुणविशेष आणि लकबी वर्णन केल्या आहेत, त्याला तोड नाही.

मनुष्यस्वभावाचे बारकाईने निरीक्षण करून अतिशय मनोरंजक पद्धतीने त्या व्यक्तिरेखा सादर करणे, त्यातून मार्मिक भाष्य करणे हे पुलं, लक्ष्मण देशपांडे, मधुकर तोरडमल यांच्यासारख्या लेखकांचे खरे तर आपल्यावर मोठेच उपकार आहेत. कधीही कंटाळा आला, वैताग आला की यांची पुस्तके उघडावी वा नाटके पाहावी. नुसतंच कसं हुईल, काय हुईल म्हणून थोडीच भागणार आहे. कारण आयुष्य हा सुद्धा एक लांबचा पल्ला आहे.



दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## सत्वगुण लक्षण


ज्योतिर्मय साहित्य

शरीर रोगाने पिडले आहे दारिद्रय ठाण मांडून बसले आहे, जो तहान भुकेने व्याकुळ झाला आहे अशा जराजर्जर अवस्थेत असलेला पण त्याची परमेश्वराची भक्ती व मनीचा निश्चय पक्का आहे . असा सत्वगुणी भक्त मिळाला तर अजून काय पाहिजे.

साधना घडून शुध्द आत्मज्ञान होणे हीच खरी सत्वगुणाची खरी करामत आहे. ज्ञानी पुरूष पूर्ण वासना रहीत,अभिमान रहित असतो. दयाळू,नरम, विशाल अंत:करणाचा असतो. दुसऱ्या चे दोष सोसुन पण त्यांना भक्ती मार्गाला लावतो.श्रवण मनन, निदिध्यास या साधन मार्गाने जाऊन ज्याला शुध्द ज्ञान आत्मसात होते साधना प्राप्त होते. वागण्या बोलण्यात लीनता येते नितीमर्यादा, ईतरांना संतोष देणे, स्वतःच्या कामापेक्षा ईतरांच्या कामाची ओढ असणे, दुसऱ्या चे गुणदोष दिसत असुनही सोईस्कर त्याकडे दुर्लक्ष करतो. कोणी टाकुन बोलला तर सहन करतो. ऊलट ऊत्तर देत नाही. रागावर नियंत्रण ठेवतो.दु:ख गिळणे, निंदकावर ऊपकार करणे, ईद्रियदमन करणे,नामस्मरणावर विश्वास असणे,संतांना शरण जाणे, लोकांना शहाणे करणे, जर ऐखादा वाममार्गाला जात असेल तर त्याला सन्मार्गावर आणणे, जो कुणावरही अन्याय करत नाही तरीपण त्याला केवळ सूडबुद्धीने छळतात अनेक प्रकारचे दु:ख देतात. सत्वगुणी माणुस हे सगळं शांतपणे झेलतो दु:ख गिळतो. हा त्याचा सात्विक गुण दिसुन येतो. जो दुसऱ्या साठी देहाने झीज सोसतो, दुर्जनाशी पम आपले पणाने वागतो,निंदकावर ऊपकार कयतो. मन ऐकत नाही नको त्या गोष्टींच्या मागे धावते ते विकारी मन विवेकाने आवरतो. ईद्रिय ताब्यात ठेवतो.सत्कर्म करावीत दुष्कर्मे सोडून द्यावीत. दोन गटात बेबनाव झाला तर तो सोडवतो. देवाधर्माच्या कार्यात ऊदा,तुळशीपत्रे, दुर्वा, लिंगार्चन, अभिषेक नामस्मरण, संतांची सेवा करतो लोकांना सन्मार्ग दाखवतो. स्वच्छता,,नामस्मरण, देवधर्म, कुठल्याही लोभाची अपेक्षा न करता ज्ञानमार्गाचा आत्मानात्मक विवेक ऊत्पन्न होऊन भगवत् भक्तीत परम पदाला पोहचलेला भक्त म्हणजे सत्वगुणी होय .

श्रीराम जय राम जय जय राम सत्वगुण नाम समाप्त.

जय जय रघूवीर समर्थ



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

## देहबुद्धीच्या विस्मरणाकरिता नाम

ज्योतिर्मय साहित्य

आपली आपल्याला ओळख करून घ्यायला नामस्मरण हाच उपाय आहे. परमेश्वराचा अंश प्राणिमात्राच्या ठिकाणी आहे खरा, पण हे जाणण्याची बुद्धी मात्र मनुष्यप्राण्याच्याच ठिकाणी आहे. पण त्याची अधोगती कशी होत जाते पहा : जीव मुळात परमेश्वरस्वरूपच असल्यामुळे प्रथम तो म्हणतो, ''मी तो, म्हणजे परमेश्वरच आहे.'' इथपासून घसरत तो म्हणतो, ''मी त्याचा आहे''; आणि अखेर ''त्याचा माझा काही संबंध नाही'' इथपर्यंत तो खाली येतो. याला कारण, देहबुद्धीचा पगडा वाढत वाढत शेवटी देह म्हणजेच मी, अशी आपली पक्की भावना होते. पण असे असले तरी मनुष्य अजाणता का होईना, पण खरे आहे ते ओळखल्यासारखेच बोलतो. जसे, एखाद्या इसमाचा स्नेही वारला तर लगेच तो इसम काय म्हणतो, 'आमचे स्नेही गेले !' याचाच अर्थ, समोर असलेल्या देहाला तो स्नेही समजत नसून, त्यात असणाऱ्या चैतन्याला, ईश्वरी अंशाला, तो खऱ्या अर्थाने आपला मित्र समजतो. म्हणजे अजाणता का होईना, पण खरे तेच त्याच्या तोंडून बाहेर पडते. असे असले तरी स्वत:च्या बाबतीत मात्र तो ही जाणीव कायम राखीत नाही, आणि आपण म्हणजे देहच असे समजून तो वागत असतो. याला कारण, ज्याचा खरा 'मी' आहे त्याचा विसर पडून देहबुद्धी बळकट होत गेली. आता याला उपाय हाच, की ज्या मार्गाने मी खाली घसरत आलो त्याच मार्गाने उलट वर जाणे. तेव्हा पहिली गोष्ट म्हणजे, आता मी जो देहरूप बनलो आहे, तो मी त्याचा, परमेश्वराचा आहे अशी जाणीव जागृत करणे. याच जाणिवेची परमावस्था म्हणजे 'मी तोच आहे' ही भावना होणे. हे कसे साधावे ? तर ज्याच्या विस्मरणाने माझी ही अधोगती झाली त्याचे स्मरण करणे. स्मरणाला उत्तम साधन म्हणजे भगवंताचे नाव. म्हणजे, नामस्मरणाचा ध्यास ठेवला की मी खरा कोण हे कळेल आणि स्वत:ची ओळख होईल. खरा परमार्थ हा असा अगदी सोपा आहे, पण तो योग्य मार्गाने केला पाहिजे. एखादी गाठ सोडविण्यासाठी कोणती दोरी ओढायची ते कळले पाहिजे, नाहीतर जास्तच गुंतागुंत होते, तसेच परमार्थाचे आहे. मी कोण हे जाणले पाहिजे, म्हणजे परमात्मा कोण हे आपोआप कळते. दोघांचे स्वरूप एकच आहे. म्हणजे दोघे एकच आहेत. परमात्मा निर्गुण आहे; तो जाणायला आपल्यालाही नको का निर्गुण, देहातीत व्हायला ? म्हणून देहबुद्धी सोडली पाहिजे. कोणतीही गोष्ट आपण जाणतो म्हणजे आपल्याला त्या वस्तुरूप व्हावे लागते; त्याखेरीज जाणणेच होत नाही. म्हणून परमात्म्याला जाणण्यासाठी आपल्याला नको का परमात्मरूप व्हायला ? यालाच 'साधू होऊन साधूस ओळखावे', 'शिवो भूत्वा शिवं यजेत', असे म्हणतात.

नामस्मरणाची चांगली धुंदी आल्यावाचून ' मी ' पण जात नाही.

संस्कृती व संस्कार



विभावरी कुलकर्णी,
मो. ८०८७८१०१९७

## परिपूर्ण आनंद

ज्योतिर्मय साहित्य

बरेचदा असे होते आपण सकारात्मक इच्छा करतो. योग्य मेडीटेशन करतो पण पाहिजे तसे रिझल्ट्स मिळत नाहीत.मग आपला विश्वास कमी होत जातो. असे का होते याचा आज आपण विचार करु या.

योग्य परिणाम होण्यासाठी सगळे निसर्ग नियम एकत्रित वापरले पाहिजेत. आपण जी इच्छा मागतो त्या पासून अलिप्त झाले पाहिजे. इच्छा पूर्तीची मागणी करायची आणि त्या पासून अलिप्त व्हायचे हे परस्पर विरोधी वाटू शकते. पण आपण ज्याच्या मागे लागतो ते पुढे पळते आणि ज्याचा फारसा विचार करत नाही ते अलगद मिळते याचा अनुभव बरेचदा आला असेल. हे कसे होते हे बघू या.

समजा आपण चांगले घर मिळाले आहे अशी इच्छा केली आहे. पण आपण निसर्ग शक्तीकडे इच्छा करुन सोडून देत नाही. नाना शंका डोक्यात येतात.

असे घर मला कसे मिळेल?

लोन मिळेल का?

मी ते फेडू शकेल का?

माझा कडे अजून पैसा येईल का?

अशा नाना शंका मनात घेऊन चिंता करत रहातो. म्हणजेच या इच्छापूर्ती विषयी *अनिश्चितता* वाटते. अनंत अडथळ्यांचा विचार आपण करतो. आणि हेच आपल्या इच्छापूर्ती मधील अडथळे असतात. हेच अडथळे दूर करायचे असतात.

इच्छापूर्ती होण्यासाठी पुढील गोष्टी कराव्यात.

– स्वतःशी वचन बद्धता

मी इच्छा निर्माण करेन पण त्यातील अडथळ्यांचा विचार करणार नाही.अलिप्तता सिद्धांत अंमलात आणणार आहे. ज्या घटना घडणार आहेत त्याचा स्वीकार करणार आहे.कोणतेही लेबल लावणार नाही.

मी अनिश्चिततेच्या क्षेत्रावर विश्वास ठेवणार आहे.

अनिश्चिततेचे क्षेत्र म्हणजे आपल्या शंका. ही इच्छा पूर्ण होणार की नाही असे वाटणे ही अनिश्चितता आहे.

मी इच्छेशी निगडित उत्तरे कशी मिळतील याचा विचार करणार नाही.

मी फक्त इच्छा पूर्ण होणार आहे यावर विश्वास ठेवणार आहे.

इच्छापूर्तीचा आनंद घेणार आहे.

हे विचार स्वतःच्या मनाशी करायचे आहेत. आपल्याला सगळ्याची चिंता करायची व स्वतःवर जबाबदारी घेण्याची सवय लागलेली असते.तीच सवय आपल्याला बदलायची आहे. थोडा वेळ लागेल पण प्रयत्न करुन हे बदलू शकतो.

आज पासून आपल्या इच्छापूर्ती मधील अडथळे आपणच दूर करु या.



नीतिशतक निरूपण

अनुवाद आणि निरूपण
ह.भ.प.चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

ज्योतिर्मय साहित्य


**सिंहः शिशुरपि निपतति मदमलिनकपोलभित्तिषु गजेषु।**

**प्रकृतिरियं सत्तवतां न खलु वयस्तेजसो हेतुः ।।**

अर्थ – सिंहाचा छावा देखील मदस्त्रावाने मलिन झालेल्या हत्तींवर आक्रमण करतो. तेजस्वी लोकांचा हा स्वभावच आहे. नक्कीच वय हे शौर्याचे कारण नसते.

शौर्य आणि वय यांचा संबंध नसतो. शौर्य म्हणजे केवळ शारीरिक युद्ध कौशल्य नव्हे. शौर्याचा संबंध जसा शारीरिक बलाशी आहे, तसाच तो मानसिक बलाशी देखील आहे. दौर्बल्यरहित मन असणा–या व्यक्तीचे ठिकाणी शौर्य निवास करीत असते. तेव्हा शौर्यासाठी वय नव्हे, तर मानसिक सुदृढता आवश्यक ठरते, असा भाव येथे व्यक्त करण्यात आला आहे.

## आचरणात आणावे असे



ज्योतिर्मय साहित्य

मैत्रीत शिकावं, शिकवावं. एकमेकांना समजावून घ्यावं. खुल्या मनानं कौतुक करावं, चुकीचे होत असेल तर तेही मोकळेपणानं सांगावं. खरे तर मैत्रीत कोणतेही कुंपण नसावं, मात्र आदरयुक्त मर्यादांचं एक मोकळं अंगण असावं. म्हणून एखादा अंदाज चुकीचा असू शकतो पण अनुभव कधीच चुकीचा असू शकत नाही कारण अंदाज आपल्या मनाची कल्पना आहे तर अनुभव आपल्या जीवनातील सत्य असते.

म्हणूनच ज्याला सन्मान प्राप्त झाल्यावरही गर्व होत नाही ,अपमान झाला तरी जो क्रोधीत होत नाही आणि क्रोध उत्पन्न झाला तरी जो कठोर शब्द उच्चारत नाही तो मनुष्य सुर्वश्रेष्ठ असतो.

सर्वांनी वाचावे : एका जेष्ठ नागरिकाची पत्नी नाही, मुलगा परदेशात आहे त्याचे एकटेपण त्याच्याच शब्दात (मुळ इंग्रजी मेसेस होता ) एका घरामधे पेपर टाकायला मुलगा गेला होता, पण त्या गृहस्थाची बाहेर लावलेली टपालपेटी बंद करून टाकलेली होती. म्हणून त्या मुलाने दरवाजावर टक टक केले. एका वयस्कर व्यक्तीने लटपटत्या पायाने चालत हळुवारपणे दरवाजा उघडला. मुलाने विचारले, टपालपेटी का बंद ठेवली आहे. ती व्यक्ती उत्तरली, मी ती मुद्दामच बंद ठेवली आहे. आणि पुढे हसून सांगितले, मला तू वर्तमानपत्र रोज दरवाजा वाजवून अगर बेल वाजवून माझ्या हातात द्यायला हवं. तो मुलगा विचारात पडला व म्हणाला, आपल्या दोघांनाही ते गैरसोईचे आहे आणि माझा जास्त वेळ जाईल. ते गृहस्थ म्हणाली, मी तुला जादा रू.५००/– दरमहा दरवाजा वाजवणे किंवा बेल वाजवण्याचे देईन.




## एकदा पदार्थ तळलेले तेल पुन्हा वापरावे का?

ज्योतिर्मय साहित्य


पदार्थ तळून झाले की एक प्रश्न कायमच असतो की उरलेल्या तेलाचं काय करायचं? कुणी म्हणतं ते तेल भाजीआमटीला वापरुन टाकावे.

कुणी त्यातच पुन्हा पुन्हा पदार्थ तळते. कुणी ते तेल न खाता सरळ फेकून देते. यातलं खरंखोटं काय? तळलेल्या तेलाचं नेमकं करायचं काय?

आणि मुळात म्हणजे एकदा पदार्थ तळलेले तेल पुन्हा पुन्हा वापरावे का?

तर त्या प्रश्नाचं एकच उत्तर की एकदा आपण ज्यात पदार्थ तळला, ते तेल उरलं तर ते तेल अजिबात वापरू नये. असे पुन्हा पुन्हा गरम केलेले तेल आरोग्यासाठी अतिशय घातक असू शकते.

तळलेले तेल पुन्हा पुन्हा का वापरू नये?



१. तळलेले तेल पुन्हा पुन्हा वापरणे आरोग्यासाठी अतिशय हानीकारक असू शकते. त्या तेलाच्या पुर्नवापराने कॅन्सरसह अनेक घातक आजार होण्याची शक्यता असते.

२. पुन्हा पुन्हा तळलेले तेल वापरल्याने खराब कॉलेस्टेरॉल वाढते.

३. पुन्हा पुन्हा गरम केलेल्या तेलाच कॅन्सर कॉजिंग एजंट, पॉलिसायकलिक अ‍ॅरोमॅटिक हायड्रोकार्बन म्हणतात ते हानीकारक घटक असतात. त्यानं कर्करोग होण्याचा धोका बळावतो.


४. अनेकदा गरम केल्यानं तेलात विषारी प्रक्रिया सुरु होते.


५. त्यातले चांगले घटक कमी होतात.

६. म्हणून पुन्हा पुन्हा तळलेले तेल आरोग्याला अतिशय हानीकारक असते ते वापरू नये.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी–चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

# रवींद्रनाथ टागोर





विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

## रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

रवींद्रनाथ टागोरांवर रवींद्रनाथ : तीन व्याख्याने असं छोटेखानी पु ल देशपांडे यांचं एक पुस्तक आहे. त्याचा उल्लेख मी मागच्या एका भागात केला होता. हे पुस्तक इतकं सुंदर आहे की मोठमोठ्या ग्रंथांमध्ये देखील जो आशय आणि जे सौंदर्य क्वचितच दृष्टीस पडेल, ते केवळ या ११२ पाने असलेल्या पुस्तकात बघायला मिळतं. पु ल देशपांडे नावाच्या एका सिद्धहस्त लेखणीचा आणि अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचा हा चमत्कार आहे. पु ल देशपांडे टागोरांबद्दल म्हणतात,‘‘ रवींद्रनाथांची अशरीरिणी प्रतिभा मला त्यांच्या कथा कविता कादंबरी नाटक निबंध आहेत चित्र संगीत अशा रूपाने भेटत असते.‘‘

रवींद्रनाथांसारखे महान साहित्यिक जरी देहाने आज आपल्यात नसले तरी आपल्या साहित्याच्या रूपाने ते अजरामर आहेत. प्रसंगी हयात असणाऱ्या माणसाच्या भेटी देखील दुर्मिळ होतात किंवा मोठ्या कष्टाने होतात परंतु रवींद्रनाथांसारखी माणसे की ज्यांनी अपार असे साहित्यधन, अक्षर वाङ्मय मागे ठेवले आहे, ते त्यांच्या साहित्यातून आपल्याला हवे तेव्हा भेटू शकतात किंवा आपण त्यांना हवे तेव्हा भेटू शकतो. त्यांचे कोणतेही पुस्तक उघडावे आणि त्यांच्या सहवासात रमून जावे.

हे केवळ रवींद्रनाथांच्या साहित्याबद्दलच खरे आहे असे नाही. कोणत्याही महान साहित्यिकाच्या बाबतीत ही गोष्ट तेवढीच सत्य आहे. ही माणसे जेव्हा आपल्याला त्यांच्या साहित्यरूपाने भेटतात, तेव्हा ती त्या माध्यमातून आपल्याशी संवाद साधतात, आपल्या समस्यांवर उत्तर सांगतात, आपल्याला धीर देतात आणि आपले अनुभव अधिक समृद्ध करतात, जीवनाकडे पाहण्याचा एक वेगळा आणि सौंदर्यवादी दृष्टिकोन प्रदान करतात. अशा व्यक्तींनी काळावर मात केलेली असते. ते आणि त्यांचे साहित्य कालातीत असते. असे साहित्य हे पिढ्यानपिढ्यांचा वारसा बनते. त्यांना मार्गदर्शन करीत राहते. त्यांच्यापुढे आदर्श ठेवते.

रवींद्रनाथांच्या शब्दात सांगायचे तर ते म्हणतात

मरणसागरपारे तोमरा अमर
तोमादेर स्मरि
रेखे गेले बानी से जे अभय अशोक
जय होक, जय होक तारि जय होक
तोमादेर स्मरि

( मरणसागरपार तुम्ही अमर तुमचं स्मरण करतो अभय अशोक अशी वाणी तुम्ही मागे ठेवून गेला आहात. जय असो जय असो तिचा जय असो. तुमचं स्मरण करतो )

टागोरांनी एवढं अक्षरधन मागे ठेवलं आहे की बंगालमधील नामवंत लेखक, कवी, संगीतकार, चित्रकार या साऱ्यांना त्यांचा मागोवा घेत घेत, मार्गदर्शन घेत वाटचाल करावी लागते. त्यांच्या प्रत्येकाच्या व्यक्तिमत्त्वात टागोरांच्या साहित्याचे, कलेचे संस्कार भिनलेले आहेत.

रवींद्रनाथानी कलेच्या ज्या ज्या क्षेत्राला स्पर्श केला, त्या त्या ठिकाणी आपला ठसा उमटवला. त्यांचा स्पर्श हा सुवर्णस्पर्श ठरला. रवींद्रनाथांनी आपल्या जीवनात ज्या ज्या गोष्टींना स्पर्श केला, तो एका चैतन्याचा, एका प्रतिभावंताचा आणि एका महाकवीचा स्पर्श होता. मग त्या गोष्टी म्हणजे त्यांनी निर्माण केलेले शांतीनिकेतन, विश्वनिकेतन किंवा श्रीनिकेतन यासारख्या पार्थिव गोष्टी असो किंवा साहित्य कला यासारख्या अपार्थिव प्रांतात केलेली मुशाफिरी असो. त्यांनी जवळपास अडीच हजार गाणी लिहिली. केवळ गाणी लिहूनच ते थांबले नाहीत तर त्यांना चालीही दिल्या. चाळीशी पन्नाशीनंतर चित्र काढायला सुरुवात केली आणि दोन अडीच हजारांवर अक्षरचित्रे ते मागे ठेवून गेले.

# मला भेटलेली ( प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष) माणसे

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

ज्यांनी आपल्या आयुष्यावर प्रभाव पाडला आहे आणि त्यांच्या मुळे आपल्या आयुष्यात काही बदल घडले आहेत. व बदल घडत आहेत यांनाही भेटलेली माणसे म्हणता येते.

‘‘पुत्र व्हावा ऐसा गुंडा, त्याचा तिन्ही लोकी झेंडा‘‘ हा अभंग आहे. यात *गुंडा* याचा सध्या प्रचलित असलेला अर्थ अभिप्रेत नाही. गुंडा म्हणजे शूर, पराक्रमी या अर्थाने हा शब्द आहे. आणि सौरभ नावाचा अर्थ मंद, गोड सुगंध असा आहे. म्हणून हा अभंग आठवला. त्याने आपला किर्तीसुगंध खरोखरच तिन्ही लोकी पसरवला आहे. आणि आपल्या नावाचा झेंडा लावला आहे. हल्ली कोणाशीही बोलले तरी त्याच्या नावाचा उल्लेख व सकाळचा व्यायाम याची चर्चा होतेच.

जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने आपल्या सर्वांच्या लाडक्या असलेल्या ‘‘सौरभ‘‘ च्या आईचे बोलणे ऐकले. मोजक्याच शब्दात त्यांनी आपल्या मुलाचे खूप मोठे कर्तृत्व सांगितले. आणि आपल्या मुलाच्या नावाने ओळखले जाणे ही ओळख एका आईला पूर्णत्व देते. त्यांच्या चेहेऱ्यावर मुलाविषयी कौतुक व अभिमान ओसंडून जात होता. त्याची आज अनुभूती घेतली. खरेच सौरभ सारखा मुलगा असणे खूप अभिमानास्पद आहे. आपण एकटेच चांगल्या मार्गावरून न जाता आपल्या सोबत लाखो माणसे





घेऊन जाणे. या साठी त्याला शतशः नमन! आपले नाव अगदी सार्थ केले आहे.

सर्वांना व्यायामाची गोडी लावून आपल्या बरोबर घेऊन जाणे किती अवघड असते. आपल्या जवळची माणसे तरी आपले ऐकतात का? पण एक दोन दिवस सहज नुसते मोबाईलवर बघणारी माणसे सुद्धा आपल्या बोलण्याने तो आपलीशी करतो. ती आपोआप कधी व्यायाम करायला लागतात हे त्यांनाच कळत नाही. आणि ‘‘आपने जॉईन किया, आधा काम हो गया‘‘ ‘‘बस और एक बार‘‘ किंवा ‘‘आप मेरे साथ करेंगे‘‘ अशी गोड वाक्ये बोलून आपली मने जिंकून घेतो. आणि आपण ४५ मिनिटे ते १ तास जणू त्याच्या ताब्यातच जातो. आपल्या मनातील वाक्ये अचूक बोलतो. जणू आपल्यावर संमोहन करतो. आपोआप लवकर उठायची सवय लागते. सकाळी सकाळी त्याचा गोड हासरा चेहरा आणि मधाळ बोलणे ऐकून तो सांगेल त्या प्रमाणे व्यायाम करण्यासाठी जणू भाग पाडतो. आणि ‘‘मैं स्वस्थ हूं, मैं खुश हूं ‘‘ असे म्हणायला लावून आपला येणारा दिवस आनंदी करुन ठेवतो. हे रोज ऐकून आपल्या मनाचेही तसेच प्रोग्रामिंग होते. जे नित्य नेमाने व्यायाम करतात त्यांनाच हे कळू शकेल. आणि आपले आरोग्य सुधारणे, दुखणी दूर करणे, आपल्याला मूळ आकारात (व्यायाम करुन जे वजन व इंच कमी होतात त्या मुळे) आणणे, घातक गोळ्या बंद करणे, शिवाय विविध कार्यक्रमातून तज्ञ मार्गदर्शक भेटवणे, मेडिटेशन घेणे. अशी किती विविध कामे सांगावीत? असा गुंडा पुत्र लाभणे हे पूर्व जन्मीचे संचितच आहे.



विभावरी कुलकर्णी,
पुणे

एक गोष्ट आवर्जून सांगावी वाटते. वयाने लहान आहे पण कर्तृत्व फार मोठे आहे. त्यामुळे तो गुरु स्थानीच आहे. मग मी एकेरी संबोधन का करते? असे वाटेल. तर आपण एकेरी संबोधन अशाच व्यक्तीला करतो, जी खूप जवळची वाटत असेल! तसे त्याने सर्वांच्या मनात प्रत्यक्ष न भेटता स्थान मिळवले आहे. त्या आपुलकीच्या नात्याने (साधारण माझ्या मुलाच्या वयाचा आहे) दादा म्हणू शकते. त्याला प्रत्यक्ष भेटण्याचा योग कधी येईल कोण जाणे? पण स्क्रीनवर मात्र रोजच भेटतो. माझ्या भावना या बऱ्याच जणांच्या असू शकतात. आज महिला दिनाच्या निमित्ताने त्याने आईला दिलेला मान व आईने केलेले कौतुक बघून खूप छान वाटले. आणि आजची त्याची गुंडगिरी म्हणजेच शिक्षणासाठी केलेले कार्य! अप्रतिमच! अशीच गुंडगिरी करण्यासाठी खूप खूप धन्यवाद आणि शुभेच्छा!

# ३ ऑक्टोबर रोजी दरवर्षी साजरा होणार



**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

महाराष्ट्रासाठी-२६ साठी अर्थसंकल्प सादर करताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मोठी घोषणा करत दरवर्षी ३ ऑक्टोबर हा दिवस अभिजात मराठी भाषा सन्मान दिन म्हणून साजरा करण्यात येणार असल्याची माहिती दिली आहे. तसेच ३ ते ९ ऑक्टोबरदरम्यान अभिजात मराठी भाषा सप्ताह साजरा करण्यात येणार असल्याची घोषणा अजित पवार यांनी दिली.

यावेळी अजित पवार म्हणाले की, केंद्रीय मंत्रिमंडळाच्या दिनांक ३ ऑक्टोबर, २०२४ रोजी झालेल्या बैठकीत अभिजात भाषेचा दर्जा दिल्याबद्दल राज्यातील जनतेच्या आणि जगभरातील मराठी भाषकिांच्यावतीने मी माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी महोदयांचे मन:पूर्वक आभार मानतो. यापुढे दरवर्षी ३ ऑक्टोबर हा दिवस अभिजात मराठी भाषा सन्मान दिन, तर ३ ते ९ ऑक्टोबरदरम्यान अभिजात मराठी भाषा सप्ताह साजरा करण्यात येईल असं अजित पवार म्हणाले.

याच बरोबर मराठी भाषा विद्यापीठ, रिद्धपूर येथे अभिजात मराठी भाषेच्या संशोधन व अध्ययनासाठी उच्च दर्जाचे संशोधन केंद्र तसेच अनुवाद अकादमी स्थापित करण्यात येणार आहे. मराठी भाषेच्या संवर्धनासाठी कार्य करणाऱ्या संस्थांच्या माध्यमातून अभिजात मराठी भाषाविषयक उपक्रम राबविण्यात येणार आहेत. मराठी भाषेच्या संशोधनातील उल्लेखनीय कामगिरीसाठी पुरस्कार सुरु करण्यात येणार आहेत. असेही अजित पवार म्हणाले.

# शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयचे स्नेहसंमेलन ‘अंतरंग २०२५’ मोठ्या उत्साहात साजरे

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**छत्रपती संभाजीनगर** – शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद,छत्रपती संभाजीनगर येथे वार्षिक स्नेहसंमेलन ‘अंतरंग २०२५’ मोठ्या उत्साहात साजरे करण्यात आले. या महाविद्यालयाच्या पहिल्या बॅचचे (१९६४) स्थापत्य अभियंता इंजि.एम. व्ही. पाटणी यांच्या वतीने सर्वोत्कृष्ट विद्यार्थ्याला सुवर्णपदक, रोख ५१,००० व प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

इंजि. एम. व्ही. पाटणी यांनी हे बक्षीस सलग दहा वर्षे देण्याची घोषणा १२ मार्च २०२२ रोजी महाविद्यालयातील माजी विद्यार्थी संघटनेच्या मेळाव्यात केली होती. या उपक्रमाचा चौथा वर्षक्रम साजरा होत असताना, २०२४-२५ या शैक्षणिक वर्षातील सर्वोत्कृष्ट विद्यार्थी पुरस्कार कुमारी राही नितीन गायकवाड हिला प्रदान करण्यात आला.

ती इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन शाखेची विद्यार्थीनी असून, तिच्या उल्लेखनीय शैक्षणिक यशासाठी तिला हा मानाचा पुरस्कार मिळाला. यापूर्वी हे बक्षीस कुमारी पल्लवी वेदपाठक, कुमारी महेश्वरी बिराजदार आणि प्रीतम निकुंभ या विद्यार्थ्यांना देण्यात आले आहे.यावेळी पुरस्काराचे प्रणेते इंजी. श्री एम. व्ही. पाटणी यांनी या योजनेमागील भावना व्यक्त केली. त्यांनी सांगितले की, *‘‘ज्या अभियांत्रिकी महाविद्यालयाने आपल्या आयुष्याला आकार दिला, त्या संस्थेचे ऋण फेडण्याच्या उद्देशाने आपण सुवर्णपदक व रोख ५१,००० देण्याची योजना आखली आहे.‘‘



डॉ. उत्तम काळवणे
अध्यक्ष, माजी विद्यार्थी संघटना
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,
छत्रपती संभाजीनगर

हा सन्मान समारंभ दिनांक* *८ मार्च २०२५ रोजी ‘अंतरंग २०२५’ या कार्यक्रमात संपन्न झाला*. या कार्यक्रमाला सी.आय.आय. चे उपाध्यक्ष आणि एन्ड्रेस व हाऊझर कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक इंजी. श्री. नरेंद्र कुलकर्णी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय डंभारे,इंजि.श्री एम. व्ही. पाटणी यांच्या शुभहस्ते पुरस्कार वितरण करण्यात आले.

याप्रसंगी माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष डॉ. उत्तम काळवणे, संतोष आटियामुलु, डॉ. चित्रा गायकवाड, डॉ. शैलेश आंबेकर, इंजि भास्कर चाटे, महाविद्यालयातील शिक्षकवृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सुरक्षा मंत्र : बालकांसह सर्वांनाच उपयुक्त पुस्तक

पुस्तक परीक्षण
रुक्मिणीकांत दीक्षित

आजच्या आधुनिक युगात गुन्हेगारीच्या स्वरूपात मोठे बदल झाले आहेत. बालकांवरील अत्याचार, लैंगिक शोषण, सायबर गुन्हे, वाहतुकीचे नियमभंग, तसेच मानसिक आरोग्याच्या समस्या वाढत आहेत. अशा परिस्थितीत सजगता व स्वतःचे रक्षण या विषयी ‘सुरक्षा मंत्र’ हे पुस्तक बालकांसह नागरिकांनाही उपयुक्त आहे. मुलांना सहज आकर्षित करणारी रंगीत चित्रे व सोप्या भाषेत माहिती देणारे हे पुस्तक जालन्याचे अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपानी यांच्या संकल्पनेतून साकार झाले आहे. या पुस्तकाला आमचे मित्र व भाषातज्ज्ञ विनोद जैतमहाल यांचा हातभार लागला आहे. तसेच रोटरी क्लब ऑफ जालना चे अध्यक्ष डॉ. दीपक बगडिया, क्लिनिकल सायकॉलॉजिस्ट श्रीमती मानसी मोर नोपानी, समन्वयक उदय शिंदे व क्रिएटिव्ह डिझायनर ध्रुव नाथानी यांनी पुस्तक निर्मितीसाठी घेतलेल्या परिश्रमांबद्दल अभिनंदन. समाजाच्या सुरक्षिततेसाठी जालना पोलीसांचे हे महत्त्वाचे पाऊल असून, प्रत्येकाने वाचावे असे हे पुस्तक आहे.

लैंगिक शोषणापासून बालकांचे संरक्षण, वाहतुकीचे नियम आणि सायबर गुन्ह्यांबाबत जागरूकता अशा तीन महत्त्वाच्या विषयांवर हे पुस्तक प्रभावी मार्गदर्शन करते. हे केवळ माहितीपर पुस्तक नसून, ते प्रत्येक वाचकाला कृतीशील बनवणारे एक प्रभावी साधन आहे.

पहिल्या भागात बालकांचे लैंगिक शोषण व छळ रोखण्याविषयी बालकांना मार्गदर्शन केलेले आहे.

बालसंरक्षण: सुरक्षित बालपणासाठी ठोस पावले. बालकांचे संरक्षण हे केवळ कर्तव्य नाही, तर समाजाची प्राथमिक जबाबदारी आहे. ‘सुरक्षा मंत्र’मध्ये ‘चांगला स्पर्श, वाईट स्पर्श’, बालकांचे मानसिक आणि शारीरिक संरक्षण, तसेच पोक्सो कायद्याविषयी सविस्तर माहिती देण्यात आली आहे.

टीन्स उपक्रम विद्यार्थ्यांसाठी शिक्षक आणि पोलीस यांच्या मार्गदर्शनाखाली सुरक्षा प्रशिक्षण.

स्वसंरक्षण शिबिरे मुलींना आत्मरक्षणाचे प्रशिक्षण देण्यासाठी पोलिसांनी घेतलेला पुढाकार.

बाल लैंगिक शोषणाविरुद्ध कठोर कायदे मुलांना त्यांचे हक्क समजावून सांगण्यासाठी उपयुक्त माहिती यात आहे. हे प्रकरण मुलांनाच नव्हे, तर पालक, शिक्षक व समाजातील प्रत्येक व्यक्तीला जागरूक करणारे आहे.

स्वसंरक्षण: आत्मनिर्भरतेचा मंत्र

स्वसंरक्षण म्हणजे केवळ शारीरिक संरक्षण नव्हे, तर मानसिक सशक्तता आणि आत्मविश्वास वाढवणारा मंत्र होय. ‘सुरक्षा मंत्र’मध्ये विद्यार्थ्यांसाठी आणि महिलांसाठी राबवण्यात येणाऱ्या स्वसंरक्षण शिबिरांची माहिती दिली आहे.

कायदेशीर मार्गदर्शन महिलांनी कोणत्या प्रसंगी कायदेशीर मदत घ्यावी याचे स्पष्ट मार्गदर्शन केले आहे.

भावनिक सशक्तता मानसिक ताणतणाव, छळ आणि त्रास यांचा सामना कसा करावा याचे प्रशिक्षण.

‘दामिनी पथक’ आणि तत्सम उपक्रम महिलांसाठी पोलिसांनी उभारलेल्या विशेष सुरक्षा यंत्रणांची माहिती. पुस्तकातील यासंदर्भातील माहिती महिलांसाठी अत्यंत प्रेरणादायी ठरत असून, त्यांना अधिक आत्मनिर्भर आणि सुरक्षित बनवण्यास मदत करते.

सायबर सुरक्षा: डिजिटल विश्वात सजगतेची गरज. आजच्या इंटरनेटच्या युगात सायबर गुन्ह्यांचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. त्याविषयी मोलाच्या सूचना केल्या आहेत.





तुमचा वैयक्तिक डेटा सुरक्षित आहे का? ऑनलाइन फसवणुकीपासून तुम्ही स्वतःचे संरक्षण कसे कराल?

सायबर गुन्हेगारीची विविध रूपे फसवे फोन कॉल, बनावट वेबसाईट, सोशल मीडियाचा गैरवापर.

सायबर सुरक्षेसाठी उपाय , बँकिंग तपशील शेअर न करण्याची गरज आणि सुरक्षित व्यवहार.

डिजिटल जबाबदारी इंटरनेटच्या माध्यमातून कोणतीही माहिती शेअर करताना घ्यावयाची काळजी.

आज प्रत्येकाने डिजिटल साक्षरता आणि सायबर सुरक्षेबाबत सावध राहण्याची आवश्यकता आहे. या माहितीतून ‘सुरक्षा मंत्र’ हे जागरूक नागरिक घडवण्याचे काम करते.

दुसर्या भागात वाहतूक नियम व तिसर्या भागात ऑनलाईन फसवणुकीविषयी माहिती आहे.

वाहतूक सुरक्षा: जबाबदार नागरिकत्वाचे पहिले पाऊल

‘‘वाहतूक नियमांचे पालन करणे म्हणजे केवळ कायद्याचे पालन करणे नव्हे, तर स्वतः च्या आणि इतरांच्या जीवनाचे रक्षण करणे आहे.‘‘ ‘सुरक्षा मंत्र’मध्ये वाहतुकीच्या नियमांचे महत्त्व स्पष्ट करून खालील मुद्द्यांवर भर देण्यात आला आहे:

वाहतूक नियमांचे पालन न केल्यास होणारे दुष्परिणाम दंड आणि कायदेशीर कारवाई.

वाहतुकीतील सुरक्षिततेचे महत्त्व हेल्मेट, सीटबेल्ट, मद्यपान करून वाहन चालवण्याचे परिणाम.

ट्रॅफिक सिग्नल आणि चिन्हांचे योग्य स्पष्टीकरण नियमांचे पालन करून अपघात कसे टाळावे?

हे प्रकरण प्रत्येक वाहनचालकासाठी आणि पादचाऱ्यांसाठी अत्यंत उपयुक्त आहे. कारण सुरक्षित रस्ते म्हणजे सुरक्षित जीवन!

जनजागृती: सुरक्षित आणि सशक्त समाज घडवण्याचा संकल्प. कोणताही कायदा प्रभावी ठरण्यासाठी समाजाची मानसिकता बदलणे गरजेचे आहे. ‘सुरक्षा मंत्र’मध्ये दिलेल्या विविध मार्गदर्शक तत्त्वांद्वारे समाजात सकारात्मक बदल घडवण्यासाठी हे पुस्तक एक महत्त्वाचे साधन ठरते.

या पुस्तकाचे फायदे:

विद्यार्थी स्वसंरक्षण आणि कायद्यांविषयी जागरूक होतात.

पालक आणि शिक्षकांना मुलांच्या सुरक्षिततेसाठी योग्य दिशा मिळते.

नागरिक वाहतुकीच्या आणि सायबर सुरक्षेच्या नियमांचे पालन करण्यास प्रेरित होतात. हे केवळ माहितीपर पुस्तक नाही, तर समाज सुधारण्यासाठी आणि नागरिकांना जबाबदार बनवण्यासाठी एक प्रभावी चळवळ आहे!

सुरक्षिततेच्या दिशेने ठोस पाऊल:

‘सुरक्षा मंत्र’ हे पुस्तक फक्त नियम सांगत नाही, तर ते समाज अधिक सुरक्षित आणि जबाबदार कसा होईल, यावर भर देते.

बालसंरक्षण, स्वसंरक्षण, सायबर सुरक्षा आणि वाहतूक नियम या विषयांवर प्रभावी मार्गदर्शन करणारे हे पुस्तक प्रत्येक व्यक्तीसाठी अत्यंत उपयुक्त आहे.

हे पुस्तक केवळ वाचण्यापुरते मर्यादित न ठेवता, त्यातील शिकवण आपल्या दैनंदिन जीवनात अमलात आणण्याची गरज आहे.

‘‘सुरक्षित समाज हा जबाबदार नागरिकांच्या योगदानातूनच घडतो.‘‘

‘‘सजगता आणि सुरक्षेच्या सवयी अंगीकारून आपण समाज सुधारू शकतो.‘‘ ‘सुरक्षा मंत्र’ हे पुस्तक प्रत्येक विद्यार्थ्याने, पालकांनी, शिक्षकांनी व नागरिकांनी वाचावे आणि त्याचा जीवनात वापर करावा. कारण सुरक्षितता ही सर्वांचीच जबाबदारी आहे.

(सुरक्षा मंत्र हे पुस्तक डाउनलोड करण्यासाठी या लेखासोबत क्यू.आर. कोड दिला आहे.)

# साहित्य संमेलनातील वादग्रस्त मुलाखती, अनावश्यक परिसंवाद



**ज्योतिर्मय साहित्य**

९८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन दिल्ली येथे पार पडले. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर हे पहिले संमेलन घेण्याचा मान सरहद पुणे. संस्थेला मिळाला हे या संमेलनाचे विशेष होते. तसेच अभिजात दर्जा मिळाल्यानंतर मराठी भाषेच्या ज्ञानभाषा म्हणून होण्याच्या मार्गात असणारे अडथळेही दूर व्हावे आणि प्रक्रिया सुरुवात व्हावी अशी अनेकांची अपेक्षा होती. परंतु अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन दरवर्षी या ना त्या कारणांमुळे गाजते असेच म्हणावे लागेल. कारण हे साहित्य संमेलनही त्याला अपवाद नाही. जरी अध्यक्ष निवडणूकीचा घोळ संपला असला तरीही अजूनही अनेक गोष्टी असतात की त्या संमेलनावर प्रभाव टाकतात. नेहमीचा प्रश्न म्हणजे साहित्य संमेलनात राजकिय लोकांचा किती सहभाग असावा.? शासनाकडून दोन कोटी रुपये मिळतात त्यात काही होऊ शकत नाही. कारण आता भव्य दिव्य संमेलनाच्या कल्पना जोर धरत आहेत. त्यासाठी पैसा उपलब्ध कुठून होणार तर राजकिय नेते त्यांच्या अधिपत्याखाली असणाऱ्या संस्था यांच्याकडूनच ते होऊ शकते. त्यामुळे कितीही वाटले तरी हे समीकरण जुळणे काही शक्य नाही. फक्त एकच आहे की आता साहित्यिकांनी राजकीय क्षेत्राविषयी किती आणि कसे भाष्य करावे आणि राजकीय लोकांनीही साहित्य संमेलनाच्या व्यासपीठाचा विचार पिठाचा किती वापर करून घ्यावा ही सिमारेषां नक्की करायला लागेल.

ह्या वर्षी संमेलन साहित्य आणि मराठी भाषा संवर्धन विचारा वर संपन्न होऊन त्यातून काहीतरी नवीन मिळेल अशी अपेक्षा होती परंतु नेहमीप्रमाणे काहीतरी कार्यक्रम ठरवले जातात आणि त्यातून मोठ्या प्रमाणात राजकीय वाद निर्माण होतात. तसे पाहिले तर साहित्य संमेलनात काय असते उद्घाटन, प्रास्ताविक, पाहुणे मंडळीचे भाषण, अध्यक्ष भाषण, कवी संमेलन, मुलाखत आणि परिसंवाद.

आता संमेलनातील कार्यक्रम कसे असावे काय असावे- काय नसावे यावर सुद्धा विचार करायची वेळ आलेली आहे. कारण या संमेलनात ते दिसून आले आहे. कवीसंमेलन होतात त्यातून काय मिळते फक्त तीन मिनिटात कविता वाचण्याचा त्या त्या कवींना आनंद मिळतो. पण समोरच्या रसिकांना ती कविता किती भावते ? आणि त्याला किती प्रेक्षक हजर असतात? त्या कवीचा परिचय सुध्दा करून दिला जात नाही. वाचा कविता प्रमाणपत्र घ्या बसा.



दिलीप देशपांडे
मोबा..८९९९५६६९१७

परिसंवाद आयोजित केले जातात त्याचे विषय काय असतात? ते विषय साहित्य संमेलनाशी किती निगडित आहे किंवा असतात ? साहित्य विषयक विचार किती मांडले जातात हा एक महत्त्वाचा भाग आहे.

या संमेलनात राजकीय वाद निर्माण होण्याला कारण ठरल्या मान्यवरांच्या मुलाखती. ''आम्ही असे घडलो'' माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, माजी केंद्रीय मंत्री सुरेश प्रभू आणि विधानसभेच्या विद्यमान उपसभापती डॉक्टर नीलम गोरे यांची मुलाखतत- एबीपी माझाचे राजीव खांडेकर आणि प्रवीण बर्दापूरकर या दोघांनी घेतली. वास्तविक पाहता साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावर ही मुलाखत असल्यामुळे ''आम्ही असे घडलो'' यात आमच्या जीवनावर साहित्याचा किती प्रभाव होता, कुठल्या प्रकारचे साहित्याचा आस्वाद घेतला. कुठले साहित्य वाचकांनी वाचायला हवे किंवा आम्ही आमच्या व्यस्ततेतही साहित्य वाचनाला किती महत्व दिले, असे काहीतरी ऐकायला मिळेल अशीच प्रेक्षकांची अपेक्षा होती. परंतु झाले काय पृथ्वीराज चव्हाण यांची मुलाखत काय किंवा सुरेश प्रभू,डॉ. निलम गोर्हे यांची मुलाखत. मुलाखती ची सुरुवात अशी झाली की राजकीय दृष्टिकोनातूनच प्रश्न विचारले गेले आणि त्यामुळे तो विषय राजकारणाच्या अंगाने पुढे जात गेला. वास्तविक खांडेकर आणि बर्दापूरकर हे दोघे ज्येष्ठ पत्रकार आहेत आणि साहित्य संमेलनाच्या मंचावर ही मुलाखत कशी घ्यावी हे त्यांना कोणी सांगावे अशातला भाग नव्हता. परंतु मुळातच या तीनही मुलाखती म्हणजे या तीनही नेत्यांच्या राजकीय कारकीर्दीचा आढावाकिंवाप्रवास होता, असेच म्हणावे लागेल. कारण त्यांना विचारले गेले प्रश्न हे त्याच अनुषंगाने होते आणि मग बोलण्याच्या ओघात अनेक गोष्टी झाल्या त्यात नीलम गोरे बोलून गेल्या दोन मर्सडीजला एक पद मिळत होते आणि त्यावरून मग मोठा वाद उभा राहिला आहे. व साहित्य हा विषय मागे पडला आणि राजकीय वाद हा पुढे आला. म्हणजे साहित्य संमेलन हा विषय न राहता साहित्य संमेलनातील वाद हाच विषय पुढे येतो. त्याचप्रमाणे पृथ्वीराज चव्हाण यांना मुलाखतीच्या शेवटी पत्रकार बर्दापूरकर त्यांना शुभेच्छा देतात की आपल्यासारखा सुसंस्कृत आणि वाचक मुख्यमंत्री महाराष्ट्राला परत मिळो. ही गोष्ट सुद्धा त्या मंचावर बोलण्याची नव्हती. कारण मग प्रश्न उपस्थित होतो की पृथ्वीराज चव्हाण यांचे नंतर आलेले मुख्यमंत्री सुसंस्कृत नव्हते का.? नाही का.? तसेच सुरेश प्रभूंची मुलाखतीत त्यांनी अनेक गोष्टीतून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा मनाचा मोठेपण सांगितला त्यावर परत बर्दापूर म्हटले ठीक आहे आपण मोदींचा मोठेपणा सांगितला त्यामुळे आम्हाला कळला, आम्ही त्यावर विश्वास ठेवतो. . एका जेष्ठ पत्रकाराने अशा प्रकारे वक्तव्य करणे हे योग्य वाटत नाही. डॉक्टर नीलम गोर्हे यांनी स्वतः सांगितले की अहो, हे काय प्रश्न विचारतात मला, मी ३०/३५ पुस्तके लिहिले आहेत आणि निरनिराळ्या विषयावर लिहिलेले आहेत. त्याविषयी मला विचारा साहित्या विषयावर विचारा त्यांनी जाणीव करून दिली परंतु तिन्ही मुलाखती त्यांच्या राजकीय कारकीर्दीवरच झाल्यात.शेवटी मुलाखत पुढे कशी न्यायची हे मुलाखतीत विचारले जाणाऱ्या प्रश्नावर अवलंबून असते.

आता या तिन्ही मान्यवरांच्या मुलाखती एखाद्या वेगळ्या कार्यक्रमात स्वतंत्रित्या घेतल्याच्या तर ती गोष्ट वेगळी होती. त्यात तिघांचे कार्य आणि राजकारणातील सहभाग मोठाच आहे. परंतु साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावर अशा राजकीय स्वरूपाच्या मुलाखती घेऊन एक वेगळाच वाद उपस्थित झाला. म्हणजे दिल्लीचे साहित्य संमेलनात साहित्याचा विचार घेऊन न जाता संमेलनातील राजकीय वादच पुढे आला.

''मराठीचा अमराठी संसार'' हा एक विषय परिसंवादात होता. या विषयाचा काय संबंध असा प्रश्न पडल्याशिवाय राहणार नाही. असे विषय परिसंवादात किंवा मुलाखतीत चर्चेला घेताना त्याचा साहित्याशी काय संबंध आहे.? हा विचार तर नक्कीच करायला हवा होता. त्या ऐवजी काही चांगले विषय आहे जसे मराठीत अनेक लेखक आहेत त्यांचा जीवन प्रवास त्यांचे लिखाण, अनुभव हे घेता आलं असतं. अनेक पुस्तके येतात बरेच पुस्तके अशी असतात की त्यांच्यावर चर्चा घडावी असे असतात. त्यापैकी पुस्तक निवड करून त्याच्यावर परिसंवाद आयोजित करण्यात आला असता.

ज्यांचे प्राथमिक व काहींचे माध्यमिक शिक्षणही मराठी माध्यमाच्या शाळेतून झाले आहे.असे अनेक कलाकार,नेते, उच्च अधिकारी,सनदी अधिकारी, उद्योजक, न्यायधीश आहेत. मराठी माध्यमातून शिक्षण घेतांना त्यांना अडचण आली नाही. त्यांच्या कार्यामुळे ते यशस्वी झाले.मराठीत त्यांचा पाया भक्कम झाला.त्यांच्या मुलाखती प्रेरणादायी ठरल्या असत्या.

बी.बी.सी मराठीला मुलाखत देताना डॉक्टर तारा भवाळकर म्हणाल्या होत्या, की मी सगळी पत्रिका बघितली आणि त्यात बरेच विषय आणि परिसंवाद, मुलाखती साहित्याशी संबंधित नसतानाही त्यात आहेत असे दिसून आले.. साहित्य विषय कार्यक्रम घेता आले असते, तसे मी कार्यक्रम आयोजित करणाऱ्या समितीला कळवले होते. परंतु या संदर्भात कार्यक्रमाच्या आयोजनात साहित्य संमेलनाध्यक्षांचा सहभाग नसतो. त्यामुळे ते कार्यक्रम ठरवण्याचा अधिकार असलेल्या समितिला लोकसाहित्यावर परिसरात ठेवावा असेही म्हटले होते परंतु लोककलेचा कार्यक्रम आहे म्हणून लोक साहित्यावर चर्चा नको असे त्यांचे मत होते.

एकूणच आता साहित्य संमेलनाचे कार्यक्रम अर्थातच चर्चा परिसंवाद मुलाखती ठरवताना योग्य विषय घेऊन आणि त्यावर त्याच अनुषंगाने मुलाखत घेतली जावी. म्हणजे असे अनावश्यक परीसंवाद आयोजित करून किंवा मुलाखती आयोजित करून साहित्य संमेलनामध्ये त्यानंतर घोळ निर्माण होणार नाही.आणि एक निखळ साहित्याचा आनंद देणारे खरे साहित्य संमेलन अनुभवायला मिळेल. याबाबतीत आता नक्कीच विचार करण्याची वेळ आलेली आहे.

***

# माता आणि मातृभूमीपेक्षा श्रेष्ठ काही नाही-अॅड.कल्पना सोनपावले

**ज्योतिर्मय साहित्य**

**करमाड** – माता आणि मातृभूमीपेक्षा श्रेष्ठ काही नाही असे असतांनाही स्त्रियांसाठी वेळोवेळी विशेष कायदे करण्याची गरत शासनाला पडते अशी खंत उच्च न्यायालयाच्या अॅडव्होकेट कल्पना सोनपावले यांनी व्यक्त केली. करमाड येथील राजीव गांधी महाविद्यालयातील अंतर्गत तक्रार समितीच्या वतीने दि.०८ मार्च रोजी जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी प्रमुख वक्त्या म्हणून त्या बोलत होत्या. मुलींसाठी तसेच महिलांसाठी स्वातंत्र्यानंतर शासनाने केलेल्या विविध कायद्यांचा त्यांनी सविस्तर आढावा घेतला. यावेळी आयोजीत कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस.एस. मुळे हे होते. तर संस्था सचिव श्रीमती शैलजा जोशी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या.

महिला दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयातील महिला प्राध्यापक, कर्मचारी व काही विद्यार्थीनींचा प्रतिनिधीक स्वरुपात सत्कार करण्यात आला. कु.नेहा घावटे, कु.भाग्यश्री पठाडे, कु. शुभांगी पठाडे यांनी महिला दिनानिमित्त तयार केलेल्या भित्तीपत्रकाचे विमोचन पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले.

अध्यक्षीय समारोप करतांना प्राचार्य डॉ. एस.एस. मुळे यांनी विद्यार्थीनींनी निर्भयपणे राहून विविध क्षेत्रात आपले नावलौकिक संपादन करावे. महाविद्यालयात नियमित येऊन स्वतःचे करिअर घडवावे व राष्ट्र उभारणीत आपला सहभाग नोंदवावा असे आवाहन केले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन अंतर्गत तक्रार समिती प्रमुख डॉ. जयश्री पाटील यांनी कुशलतेने सांभाळले. तर समिती सदस्य प्रा. मनोज देवकर यांनी आभार मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अंतर्गत तक्रार समितीबरोबर डॉ. ललित गोल्डे, डॉ. रमेश कचरे, डॉ. अमित राऊत, प्रा.प्रशांत माठे, डॉ. किशोर काळे, रोहीणी जोशी, अलका कुलकर्णी, शिवकुमार मुक्तापुरे, मधुकर राठोड यांनी परिश्रम घेतले. यावेळी महाविद्यालयातील प्रा.डॉ. चिंचोलीकर, डॉ. लिहीणार, डॉ. नरेश डहाळे, डॉ. लक्ष्मीकांत दांडगे, डॉ. कालिदास फड, प्रसन्न वैद्य तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी-विद्यार्थीनी उपस्थित होते.



गमतीदार किस्से

# छापा काटा

**ज्योतिर्मय साहित्य**

कॉलेज संपून मी जॉबला लागले. तिथे शिफ्ट ड्यूटी होती. दुपारी २ ते रात्री १०. ट्रेनने येऊन बस स्टॉप वर १०. ४५ व्हायचे. रोज एक तरुण मुलगा व त्याचे आईबाबा स्टॉपवर असायचे. आता तरुण वय व तो मुलगाही थोडा त्या वयाला किंवा स्वभावाला अनुसरून व्रात्य वैगरे असा काही. सारखा माझ्याकडे बघत असायचा. उतरायचा पण शेवटी माझ्याच स्टॉपला. आता हे रोजचंच झालं होतं; पण अनुभव मात्र वेगवेगळा. कधी सारखा माझ्याकडे पाहायचा तर कधी पहायचाच नाही. एकदम सभ्य...!! तो मी नव्हेच स्टाईलमधे. आता मी संभ्रमात. नक्की काय प्रकार आहे; काही कळतच नव्हते. असे काही दिवस गेले. मी तो जॉब सोडून दुसरा पकडला व माझी स्टॉपवरची वेळही बदलली. स्टॉपवरील भेटीगाठी बंद झाल्या. त्या दरम्यान माझं लग्न जमलं. बोरिवलीला राहत होते. ऑफिस सुटल्यावर गोरेगावला उतरले. मैत्रिणीला पत्रिका द्यायला. पुन्हा गोरेगावला ट्रेन पकडली बोरिवली जायला. ऑफिस वेळ त्यामुळे खूप गर्दी होती. कशीबशी चढले. तितक्यात एक माणूस मला म्हणाला मॅडम तो माणूस तुम्हाला बोलवतो आहे. जा... खूप लांब नजर टाकली. पहिले तर तोच मुलगा होता जो मला स्टॉप वर रोज भेटायचा. मी गर्दीतून जागा करून करून त्याच्याकडे गेले. त्यांनी त्याची सीट मला बसायला दिली. मीही धन्यवाद वै. औपचारिकता.

तो: दिसत नाहीस हल्ली स्टॉप वर

मी: माझा जॉब बदलला ना...वेळ पण बदलली.

मी: संध्याकाळी सात वाजता बस पकडते आता.

तो: ओहह.....आता कुठे जॉब ?

मी: ताडदेव

तो: आता इथे मधेच कुठे ?

मी: मैत्रिणीकडे

तो: सहज...की काही विशेष

मी: विशेषच

तो: मला सांगण्यासारखे

मी: हो...सांगते ना ...(मनातल्या मनात विचार फारच बोलबच्चन हा...)

मैत्रिणीला निमंत्रण द्यायला आले.

तो: कसले ?

मी: माझं लग्न जमलय ना... त्याचं

तो: क्या बात है.... अभिनंदन म्हणत त्याने हस्तांदोलन करायला हात पुढे केला. झालं...तोपर्यंत बोरिवली आली. आम्ही एकत्रच स्टॉपवर गेलो. त्याच्यासोबत जाताना मला खूप अवघडल्यासारखं वाटतं होतं. आजच्या पिढीसारखी बिनधास्त वागण्याची त्यावेळी पद्धत नव्हती. बस आली आम्ही चढलो. शेवट स्टॉपवर उतरलो. तो त्याच्या मार्गाने गेला. मी माझ्या मार्गाने. तो थेट माझ्या लग्नाच्या जेवणावळ टेबलवर दिसला. त्याच्यासोबत त्याचे बाबा पण होते. मी संभ्रमात... हा व बाबा माझ्या लग्नात कसे.... कालांतराने कळलं की त्याचे बाबा माझ्या बाबांचे मित्र. आता मी जाणून होते की तो खूप बोलका होता. स्वताहून बोलायला यायचा. मी ही ठरवल की आता आपण सुधा त्याची स्वतःहून विचारपूस करायची. पुन्हा मधे काही काळ गेला. मी माहेरी आले होते व एक नेहमीच्याच दुकानात काही बिस्कीट वै. घ्यायला गेले. नेमका तो तिथे होता. मी त्याला पाहून एक स्मितहास्य केलं. तो एकदम स्तब्ध. चेहेऱ्यावर अगदीच ओळख नसल्याचे भाव. मी विचारले कसा आहेस...? उत्तर तर नाहीच दिले उलट आपली काही ओळख नसल्याचे भाव चेहेऱ्यावर ठेऊन तिथून निघून गेला. त्या दुकानदारा समोर हे सगळं घडलं. मला काहीसं अपमानित झाल्यासारखं वाटलं. मी न राहुन दुकानदाराला बोलले असा काय हा....?? काहीच बोलला नाही. दुकानदार माझ्या ओळखीचा होता.

बेबी तो खूप कमीच बोलतो.

अं..... असं कसं काका....मी नेहमी बोलते याच्याशी.

खूप बोलतो भरभरून हा....आता काय झालं...!!

बेबी हा नाही बोलत जास्त. जास्त बोलणारा दुसरा आहे.

मी: म्हणजे

हे दोन जुळे भाऊ आहेत. एक भरपूर बोलतो आणि एक एकदम आबोल...

आता मला सारे मागील संदर्भ जुळून आले बस स्टॉप वरचे. एक सभ्य व व्रात्य असल्याचे



श्रीमती कल्पना दिलीप मापूसकर
मीरा रोड
९०८२६ ४६४९४






हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559